बाल हक्क संरक्षण आयोग
महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य
# बाल हक्क संरक्षण आयोग



# वार्षिक अहवाल

सन २०२२-२०२३

# वार्षिक अहवाल

# २०२२ – २३

कार्यालय
३ मजला, शासकीय परिवहन सेवा इमारत,
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई,
महाराष्ट्र राज्य





## महिला व बाल विकास, महाराष्ट्र शासन



**ना. अँड. यशोमती ठाकूर**
दि.३०/१२/२०१९ ते २९/६/२०२२

## माननीय राज्यमंत्री
## महिला व बाल विकास, महाराष्ट्र शासन



**ना. श्री. ओमप्रकाश कडू**
दि. ३०/१२/२०१९ ते २७/६/२०२२

## मा. मंत्री,
## महिला व बाल विकास, महाराष्ट्र शासन



**ना. श्री. मंगल प्रभात लोढ़ा**
दि. १४/८/२०२२ ते १४/७/२०२३

## माननीय राज्यमंत्री,
## महिला व बाल विकास, महाराष्ट्र शासन



**मा.ना. संजय बनसोडे**
दि. २७/६/२०२२ ते २९/६/२०२२

**माननीय मंत्री**
**महिला व बाल विकास, महाराष्ट्र शासन**



**ना. अदिति सुनील तटकरे**
दि. १४/७/२०२३ ते अद्याप पर्यंत



# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या
# अध्यक्षा



अँड. श्रीम. सुशीबेन शाह

## महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्य



अँड. श्रीम. निलिमा चव्हाण



अँड. श्रीम. प्रज्ञा खोसरे



अँड. श्री. संजय सेंगर



अँड. श्रीम. जयश्री पालवे



श्रीम. सायली पालखेडकर



श्री. चैतन्य पुरंदरे



# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे
# सचिव



**श्री. उदय जाधव (भ्रा.प्र.से.)**
दि. १८/१ /२०२१ ते १६/५/२०२३



**श्री. शिवराज श्रीकांत पाटील (भा.प्र.से.)**
दि. १६/५/२०२३ ते ३१/१२/२०२३

# आयोगाच्या कार्यालयातील प्रशासकीय संरचना मंजूर १२ पदे

| अ. क्र | पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे |
|---|---|---|---|
| १ | सचिव | १ | १ |
| २ | विधी सल्लागार | १ | १ |
| ३ | प्रशासकीय अधिकारी | १ | ० |
| ४ | सहायक प्रशासकीय अधिकारी तथा लेखा अधिकारी | १ | १ |
| ५ | उच्च श्रेणी लघुलेखक | २ | ० |
| ६ | परिवीक्षा अधिकारी | २ | १ |
| ७ | लिपिक | २ | २ |
| ८ | शिपाई | २ | १ |




# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शीर्ष | पा. क्र. |
|---|---|---|
| १ | अध्यक्षांचे मनोगत | १ |
| २ | आयोगाची स्थापना | ३ |
| ३ | आयोगाची कार्ये | |
| | १. राज्य बाल हक्क संरक्षण २००५ अधिनियमांतर्गत | ६ |
| | २. मोफत आणि सक्तीचा शिक्षण कायदा २००९ अंतर्गत | ९ |
| ४ | तक्रार निवारण यंत्रणा | |
| | १. अधिसूचना -१ | १० |
| | २. अधिसूचना -२ | ११ |
| ५ | तक्रारी व तपासणी केलेल्या चौकशा व आयोगाद्वारे घेण्यात आलेल्या सुनावण्या | १४ |
| ६ | कार्यशाळा/चर्चासत्र/परिसंवाद/सार्वजनिक सुनावणी | १५ |
| ७ | आयोगाचे महत्त्वपूर्ण कामकाज | १९ |
| ८ | आयोगाचे दौरे व भेटी | २७ |
| ९ | प्रकरणांचा गोषवारा | ४३ |
| १० | लेखापरिक्षण अहवाल २०२२-२३ | ४५ |




# लघुनामे

| | |
|---|---|
| ए डी जी पी | अतिरिक्त पोलीस महासंचालक (Additional Director General of Police) |
| सी सी आय | बालकांची देखभाल करणाऱ्या संस्था (Childcare Institution) |
| सी सी एस ई | बालकांच्या लैंगिक शोषणाचा सामना करणे (Countering Child Sexual Exploitation) |
| सी डब्ल्यू सी | बाल कल्याण समिती (Child Welfare Committee) |
| सी डब्ल्यू पी ओ | बाल कल्याण पोलीस अधिकारी (Child Welfare Police Officer) |
| डी सी पी यु | जिल्हा बाल संरक्षण पथक (District Child Protection Unit) |
| डी ओ | जिल्हा अधिकारी (District Officer) |
| डी डब्ल्यू सी डी | महिला व बाल कल्याण विभाग (Department of Women and Child Development) |
| आय ए एस | भारतीय प्रशासकीय सेवा (Indian Administration Services) |



| | |
|---|---|
| आय सी एम ई सी | बेपत्ता आणि शोषित बालकांसाठी आंतरराष्ट्रीय केंद्र(International Centre for Missing and Exploited Children) |
| आय जी | महानिरीक्षक (Inspector General) |
| आय जे एम | आंतरराष्ट्रीय न्याय अभियान (International Justice Mission) |
| आय पी एस | भारतीय पोलीस सेवा (Indian Police Service) |
| जे जे अॅक्ट | बाल न्याय अधिनियम २०१५ (Juvenile Justice Act, 2015) |
| जे जे बी | बाल न्याय मंडळ (Juvenile Justice Board) |
| एम ओ यु | सामंजस्य करार (Memorandum of Understanding) |
| एम एस सी पी सी आर | महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग(Maharashtra State Commission for Protection of Child Rights) |
| एन सी एम ई सी | बेपत्ता आणि शोषित बालकांसाठी राष्ट्रीय केंद्र (National Centre for Missing and Exploited Children) |

| | |
|---|---|
| एन सी पी सी आर | राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग (National Commission for Protection of Child Rights) |
| एन सी आर बी | राष्ट्रीय गुन्हे अभिलेख कार्यालय (National Crime Records Bureau) |
| पी पी पी | सार्वजनिक – खासगी भागीदारी ( Public Private Partnership ) |
| पी डब्ल्यू सी | प्राईसवाटर हाउस कुपर्स ( PricewaterhouseCoopers ) |
| एस सी | सर्वोच्च न्यायालय ( Supreme Court ) |
| एस आय आर | सामाजिक तपास अहवाल ( Social Investigation Report ) |
| एस जे पी यु | विशेष बाल पोलीस पथक ( Special Juvenile Police Unit ) |
| एस पी | पोलीस अधीक्षक ( Superintendent of Police ) |

# अध्यक्षांचे मनोगत

कोणत्याही देशाचा खरा ठेवा म्हणजे त्या देशातील बालकं निरागस, निष्पाप, पण प्रचंड शक्यता असलेली. ही मुलं फक्त आजचे नागरिक नाहीत, तर उद्याच्या राष्ट्राचे शिल्पकार आहेत. म्हणूनच त्यांच्या बालपणाचे संरक्षण, पोषण आणि प्रोत्साहन ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला दिलेले हक्क जगण्याचा, विकासाचा, सहभागाचा व संरक्षणाचा हे मूलभूत अधिकार मुलांनाही तितक्याच ताकदीने लागू होतात. या अधिकारांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची स्थापना २४ जुलै २००७ रोजी राज्य शासनाने केली.

आयोगाचा मुख्य उद्देश म्हणजे प्रत्येक बालकाला एक सुरक्षित, सशक्त व आत्मविश्वासपूर्ण जीवन जगण्यासाठी योग्य पर्यावरण निर्माण करून देणे. बाल हक्क संरक्षण अधिनियम २००५, बाल न्याय अधिनियम २०१५, लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायदा २०१२, तसेच शिक्षण हक्क कायदा २००९ यांसारख्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी आयोग विविध शासकीय विभागांशी समन्वय साधतो. आयोगाकडे येणाऱ्या प्रत्येक तक्रारीची गांभीर्याने दखल घेऊन बालकांना त्वरित न्याय मिळावा यासाठी आयोग नेहमीच सज्ज असतो. केवळ तक्रारींचे निराकरणच नव्हे, तर बालकांच्या सर्वांगीण हितासाठी कार्यशाळा, जनजागृती उपक्रम, समुपदेशन आणि विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम राज्यभर राबवले जात आहेत.

आयोगाच्या कार्यकाळात खालील उपक्रम राबविले :

१) खेलते रहो

२) बालस्नेही पुरस्कार

# अध्यक्षांचे मनोगत

तसेच POCSO आणि J.J. कायद्यांचे पुनरावलोकन, विभागनिहाय प्रलंबित प्रकरणांची सुनावणी, तसेच मुलांच्या पुनर्वसनासाठी विशेष प्रोटोकॉल विकसित करणे ही महत्त्वाची पावले उचलण्यात आली. या उपक्रमांमुळे राज्यातील बालकांना न्याय, संरक्षण आणि उज्वल भविष्याची दिशा मिळण्यास मोलाची मदत झाली आहे.

आजपर्यंत आयोगाने हजारो बालकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. पोलीस, न्यायालये, बालकल्याण समित्या, आरोग्य व शिक्षण संस्था यांच्या सहकार्याने आयोग एक दृढ व सक्षम रचना निर्माण करत आहे, ज्यातून प्रत्येक बालकासाठी सुरक्षित आणि सन्मानपूर्वक वातावरण तयार होईल. आज जेव्हा संपूर्ण महाराष्ट्रात बालहक्कांची जाणीव वाढताना दिसते, तेव्हा ही सामाजिक जागृती म्हणजे आयोगाच्या कार्याचे फलित आहे, असे मला वाटते. बालकांना सुरक्षितता, विकासाची संधी आणि न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग सदैव तत्पर आहे आणि राहील, ही माझी खात्री आहे.

आपण सर्वांनी एकत्रितपणे हे सुनिश्चित करावे की आपल्या राज्यातील प्रत्येक बालकाचे बालपण आनंदी, सुरक्षित व सन्माननीय असेल कारण हीच आपल्या राष्ट्राची खरी उन्नती आहे.

**अँड. श्रीम. सुशीबेन शाह**



# आयोगाची स्थापना

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची स्थापना जुलै २००७ मध्ये एक वैधानिक संस्था म्हणून बाल हक्क संरक्षण अधिनियम २००५ (२००६ चा ४) च्या अंतर्गत राज्यातील बाल हक्कांचे संरक्षण, प्रोत्साहन आणि बचाव करण्यासाठी करण्यात आली. कायद्यात, बालक या शब्दाची व्याख्या अठरा वर्षांपेक्षा कमी वयाची व्यक्ती अशी केली गेली आहे. कायद्याच्या कलम २(ब) नुसार बाल हक्क संदर्भातील संयुक्त राष्ट्र संघाच्या सभेतील स्वीकृत मुख्य मानकांमध्ये (CRC) अंतर्गत देण्यात आलेल्या खालील अधिकारांचा समावेश आहे. 'CRC' मध्ये बालकांसाठी विहित केलेली मुख्य मानके खालील प्रमाणे आहेत.

- वंश, रंग, लिंग, भाषा, धर्म, राजकीय किंवा अन्य मते, राष्ट्रीय वांशिक किंवा सामाजिक मूळ, मालमत्ता, अपंगत्व, जन्म किंवा बालकाची सामाजिक स्थिती यावर आधारित सर्व प्रकारच्या भेदभावांपासून बालकास संरक्षण दिले जाते.
- बालकांशी संबंधित सर्व कृतींमध्ये बालकाचे हितसंबंध प्राथमिक ठरते.
- बालकाला ओळख, नाव आणि राष्ट्रीयत्व मिळण्याचा हक्क आहे.
- प्रत्येक बालकास जीवनाचा, जगण्याचा व विकासाचा जन्मत: हक्क असतो, ज्यात आरोग्याच्या उच्चतम साध्य दर्जापासून आजाराच्या उपचारांच्या सुविधांपर्यंत, शिक्षणाचा हक्क यांचा समावेश आहे, जे बालकाच्या व्यक्तिमत्वाच्या पूर्ण क्षमतेत विकास होण्यासाठी निर्देशित केले जाते; बालकांना आणि सामाजिक सुरक्षिततेचा लाभ घेण्याचा अधिकार आहे.



- बालकास आराम व विश्रांती घेण्याचा, खेळ आणि करमणुकीच्या उपक्रमांमध्ये व्यस्त राहण्याचा हक्क आहे.
- प्रत्येक बालकास आदर्श मानसिक, आध्यात्मिक, नैतिक आणि सामाजिक विकासाचा हक्क आहे.
- कोणत्याही बालकाचे कोणत्याही हेतूने किंवा कोणत्याही स्वरूपात बेकायदेशीर हस्तांतरण, अपहरण, विक्री किंवा अनैतिक व्यापार होणार नाही.
- बालकांच्या मतांना योग्य महत्त्व देण्यात यावे.
- बालकाला पालकांच्या इच्छेविरूध्द त्यांच्यापासून विभक्त केले जाऊ शकत नाही. केवळ जर बालकाच्या हितासाठी असे वेगळे करणे आवश्यक असेल तर पालकांपासून विभक्त केले जाऊ शकते.
- कौटुंबिक वातावरणापासून वंचित असलेल्या बालकाला राज्याव्दारे प्रदान केलेले विशेष संरक्षण आणि सहाय्य मिळण्याचा अधिकार आहे.
- बालकांच्या संगोपनासाठी किंवा संरक्षणासाठी जबाबदार असणाऱ्या संस्था, सेवा आणि सुविधेच्या स्थापित केलेल्या विहीत मानकांचे पालन करतील.
- बालक आर्थिक शोषणापासून संरक्षित असावे.
- बालकांना मादक औषधे आणि मनावर दुष्परिणाम करणा-या पदार्थांचा अवैध वापर करण्यास अधीन केले जाऊ नये.
- मानसिक किंवा शारीरिकदृष्ट्या अपंग बालकाने संपूर्ण आणि परिपूर्ण आयुष्याचा आनंद घ्यावा, ज्यामुळे त्यांची प्रतिष्ठा सुनिश्चित होईल, आत्मनिर्भरता वाढेल आणि समाजात सक्रिय सहभागाची सुविधा मिळेल.
- लैंगिक शोषणासह सर्व प्रकारच्या शारीरिक व मानसिक हिंसाचार, दुखापत किंवा गैरवर्तन, दुर्लक्ष किंवा दुर्व्यवहार किंवा शोषण यापासून बालके सुरक्षित असावी.
- प्रत्येक बालक लैंगिक शोषण आणि लैंगिक शोषणाच्या सर्व प्रकारांपासून संरक्षित असले पाहिजे.

- कोणत्याही बालकाला अत्याचार किंवा इतर क्रूर, अमानुष किंवा मानहानीकारक वागणूक वा शिक्षेअधीन केले जाऊ शकत नाही किंवा बेकायदेशीरपणे किंवा कोणत्याही प्रकारे त्याच्या स्वातंत्र्यापासून वंचित ठेवले जाऊ शकत नाही.
- कोणत्याही प्रकारची उपेक्षा, शोषण किंवा अत्याचार, अशा प्रकारच्या छळाला बळी पडलेल्या बालकाचे शारीरिक व मानसिक पुनर्वसन आणि सामाजात त्यांचे पुर्नएकिकरण प्रोत्साहित करण्यासाठी सर्व योग्य उपाययोजना केल्या जातील.
- सशस्त्र संघर्षातील, युध्दजन्य परिस्थितीमधील बालकांना लागू असलेल्या आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्याच्या नियमांचा आदर केला जावा.
- दंडात्मक कायद्याचे उल्लंघन केल्याचा आरोप असलेल्या किंवा अशी ओळख असलेल्या प्रत्येक बालकास, सन्मान आणि योग्य वागणूक मिळण्याचा अधिकार आहे.
- कोणत्याही बालकावर (ज्याच्यावर आरोप लावला आहे किंवा आरोप सिद्ध झाला आहे अथवा ज्याने कायदा मोडला आहे) त्याच्या/तिच्या गोपनीयतेमध्ये, घरामध्ये किंवा बेकायदेशीर हस्तक्षेपापासून त्याच्या/तिच्या सन्मान आणि प्रतिष्ठेवर बाधा न येऊ देणे.



# आयोगाची कार्ये

## राज्य बाल हक्क संरक्षण कायदा २००५ अधिनियमांतर्गत

- बाल हक्कांच्या संरक्षणासाठी कोणत्याही कायदयाव्दारे किंवा त्या अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या संरक्षणाची तपासणी आणि आढावा घेणे आणि त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपायांची शिफारस करणे;
- राज्य शासन त्या खबरदारीचे उपाय म्हणून आयोगास आवश्यकता भासल्यास कामाचा वार्षिक अथवा ठराविक नियतकालीक अहवाल सादर करणे;
- बालकांच्या अधिकाराचे उल्लंघन केल्याबद्दल चौकशी करणे आणि अशा प्रकरणांमध्ये कार्यवाहीची शिफारस करणे;
- दहशतवाद, जातीय हिंसाचार, दंगली, नैसर्गिक आपत्ती, घरगुती हिंसाचार, एचआयव्ही/एड्स, तस्करी, दुर्व्यवहार, छळ व शोषण, अश्लील साहित्य (Pornography) आणि वेश्याव्यवसाय यांनी बाधित झालेल्या बालकांच्या हक्कांचा फायदा घेण्यास प्रतिबंध करणाऱ्या सर्व बाबींचे परीक्षण करणे आणि योग्य उपाययोजनांची शिफारस करणे;
- विशेष काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांशी संबंधित सर्व समस्यांकडे लक्ष देणे, ज्यात त्रस्त बालके, उपेक्षित आणि वंचित बालके, विधीसंघर्षग्रस्त बालके, अल्पवयीन बालके, कुटुंबं नसलेली बालके आणि कैद्यांची बालके यांचा समावेश आहे व तसेच योग्य उपाययोजनांची शिफारस करणे;



- बालकांच्या हक्कांबाबत संशोधन हाती घेणे आणि संशोधनास प्रोत्साहन देणे;
- समाजातील विविध घटकांमध्ये बाल हक्कांबाबत साक्षरता पसरवणे आणि प्रकाशने, माध्यमे, चर्चासत्रे आणि इतर उपलब्ध माध्यमांव्दारे या अधिकारांच्या संरक्षणासाठी उपलब्ध असलेल्या उपाययोजनांबाबत जागरुकता वाढविणे;
- राज्य सरकारच्या नियंत्रणाखालील सुधारगृह, किंवा बालकांसाठी असणारे कोणतेही निवासस्थान किंवा संस्था याची तपासणी करणे, सामाजिक संघटनांव्दारे चालविल्या जाणाऱ्या संस्थेसह इतर कोणतेही अधिकारी, जिथे बालकांना उपचार, सुधारणा किंवा संरक्षणाच्या उद्देशाने ताब्यात घेण्यात आले आहे किंवा त्यांना राहण्यासाठी ठिकाण दिली आहेत आणि आवश्यक वाटल्यास उपचारात्मक कार्यवाहीसाठी या अधिकाऱ्यांकडे नेणे;
- तक्रारींची चौकशी करणे किंवा खाली नमूद केलेल्या बाबीं संबंधित (SU-MOTO) स्वंयप्रेरणेने सूचना घेणे

१. बालकांच्या अधिकाराचे उल्लंघन आणि वंचित ठेवणे;

२. बालकांच्या संरक्षणासाठी आणि विकासासाठी प्रदान केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी न करणे.

३. बालकांचे त्रास कमी करण्याच्या आणि कल्याण सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने धोरणात्मक निर्णय, मार्गदर्शक तत्वे किंवा सूचनांचे पालन न करणे तसेच अशा बालकांना आराम प्रदान करणे किंवा अशा प्रकरणांमध्ये उद्भवणारे मुद्दे योग्य अधिकाऱ्याकडे उपस्थित करणे, आणि बालकाच्या हक्कांच्या वाढीसाठी अशी इतर आवश्यक कार्ये व वरील कार्यांमधील अनुषंगिक कोणतीही बाब.

- बालकाच्या हक्कांबाबत अधिवेशनाच्या अनुपालनाचे मूल्यांकन करण्यासाठी विद्यमान कायदा, धोरण आणि सराव यांचे विश्लेषण करणे, राज्य सरकारकडे दरवर्षी आणि आयोगाला योग्य वाटेल अशा इतर कालांतराने या सुरक्षा उपायांच्या कामकाजाचा अहवाल सादर करणे;

- जेथे स्वतः बालकांव्दारे किंवा त्यांच्या वतीने संबंधित व्यक्तीव्दारे चिंता व्यक्त केली गेली असेल तेथे औपचारिक तपासणी करणे;
- बालकांच्या कामांमध्ये आणि बालकांशी संबंधित सर्व सरकारी विभाग/ संस्था जे बालकांशी निगडित आहेत, त्यांना प्रोत्साहन देणे, त्यांचा आदर करणे आणि त्यांच्या दृष्टिकोनाचा गांभीर्याने विचार करणे.
- बाल हक्कांबद्दल माहिती सादरीकरण आणि प्रसार करणे;
- बालकांवरील माहिती संकलित करणे आणि विश्लेषण करणे;
- शालेय अभ्यासक्रमात बाल हक्कांच्या समावेशास प्रोत्साहित करणे, शिक्षकांचे प्रशिक्षण आणि बालकांशी संबंधित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे.

# मोफत आणि सक्तीचा शिक्षण कायदा २००९ अंतर्गत

शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ च्या कलम ३१ आणि ३२ अंतर्गत बालहक्क संरक्षण राज्य आयोगाला पुढील कार्ये सोपविण्यात आली आहेत:

- या कायद्याव्दारे किंवा त्या अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या संरक्षणाची तपासणी करणे आणि आढावा घेणे (शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९) आणि त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपायांची शिफारस करणे.
- बालकाच्या नि:शुल्क आणि अनिवार्य शिक्षणा संबंधीच्या तक्रारींची चौकशी करणे.
- बाल हक्क कायदा २००५ च्या संरक्षणासाठी या आयोगाच्या कलम १५ आणि २४ नुसार आवश्यक ती कार्यवाही करणे.
- बाल हक्क कायदा आणि अनिवार्य शिक्षणाशी संबंधित कोणत्याही प्रकरणाची चौकशी करताना आयोगाच्या कलम १४ आणि २४ अंतर्गत बाल अधिकार अधिनियम २००५ च्या संरक्षणासाठी त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा समान अधिकार असेल.
- कलम ३१ मध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही गोष्टीचा प्रतिकार न करता, शिक्षण हक्क कायदयांतर्गत बालकांच्या हक्काशी संबंधित कोणतीही तक्रार असल्यास, कुठलीही व्यक्ती कार्यक्षेत्रात असलेल्या स्थानिक प्राधिकरणाकडे लेखी तक्रार देऊ शकते.
- उपकलम ३२(१) अंतर्गत तक्रार प्राप्त झाल्यानंतर स्थानिक प्राधिकरण या प्रकरणाचा निर्णय घेईल.
- स्थानिक प्राधिकरणाच्या निर्णयामुळे असंतुष्ट असलेली कोणतीही व्यक्ती राज्य आयोगाकडे अपील करण्यास प्राधान्य देऊ शकते. अधिनियम कलम ३२ (३) अन्वये, सदर प्राप्त अपिलावर राज्य आयोग निर्णय घेईल.बाल हक्कांसाठी राज्य आयोग ही एक वैधानिक संस्था आहे, जी बाल हक्क संरक्षण अधिनियम २००५ अंतर्गत गठित करण्यात आली आहे. राज्य सरकारने आदेश क्रमांक CRC./ २००६/CR.१३९/D-३/ दिनांक २४/७/२००७ अन्वये राज्य आयोगाची निर्मिती केली आहे.



# तक्रार निवारण यंत्रणा

## अधिसूचना १

- कलम १३ च्या उपकलम(१) जे आणि (१) जे (i) (ii) (iii) आणि कलम १३ चे उपकलम (१) के, उपकलमांसह, कलम १४ च्या कलम (१) अंतर्गत नमूद केलेल्या तरतूदींन्वये राज्य आयोगास दिलेल्या अधिकारानुसार, या तरतूदींच्या विचाराधीन प्रस्तावांच्या अंमल बजावणीसाठी कार्यपद्धती निश्चितीच्या प्रस्तावाला आयोगाने मान्यता दिली आहे, त्यानुसार खालीलप्रमाणे प्रक्रिया तयार केली आहे.
- बाल हक्क आयोग कायदा २००५ च्या कलम १३ चे उपकलम (J) (i) (ii) (iii) चे अनुसरण करण्यासाठी, माहिती आयोग आणि महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या धर्तीवर आयोगाच्या सदस्यांमध्ये खालील प्रमाणे कामांचे वाटप करण्यात आले आहे.
- अ-१) आयोगाचे मुख्य खंडपीठ मुंबई मध्ये असेल आणि औरंगाबाद व नागपूर येथे अनुक्रमे न्यायनिर्णय खंडपीठ असतील.
- अ-२) आयोगाच्या बाल हक्क संरक्षण अधिनियम २००५ उपकलमांतर्गत तक्रारी मुंबईत प्राप्त होतील आणि तक्रार मिळाल्यानंतर संबंधित खंडपीठांना द्यावी लागेल.
- त्यांच्या कार्यक्षेत्रात सुनावणी घेण्याच्या ठिकाणांमध्ये बदल संबंधित खंडपीठाच्या सदस्यांव्दारे निश्चित केला जाईल.
- सुनावणीसाठी कमीतकमी दोन सदस्यांची गणपूर्ती आवश्यक आहे.
- एका खंडपीठातून दुस-या खंडपीठात सदस्यांच्या बदलीचा निर्णय आयोगाच्या बैठकीत घेण्यात येईल.
- जर एखाद्या महत्त्वाच्या प्रकरणाचा सहभाग असेल तर ही बाब मुंबईत संपूर्ण आयोगाच्या सभागृहात ऐकली जाईल. प्रकरणाचे स्वरूप महत्वाचे आहे की नाही हे मा.अध्यक्ष किंवा सचिव (सदस्य, सचिव म्हणून संदर्भित) निर्णय घेतील. संपूर्ण सभागृह सुनावणी मुंबईत दरमहा किमान एकदा तरी होईल. संपूर्ण सभागृह सुनावणी आणि आयोगाची बैठक कदाचित त्याच दिवशी आयोजित केली जाईल.
- सदस्यांच्या कामाचा भार लक्षात घेऊन सभापती त्यांना एका खंडामधून (खंडपीठ) इतर खंडामध्ये सुनावणीसाठी पाठवू शकतात.



# अधिसूचना २

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने राज्य शासनाच्या दिनांक २४/७/२००५ आदेशानुसार बाल हक्कांच्या संरक्षणासाठी स्थापन केलेल्या आयोगाला 'बाल हक्क संरक्षण आयोग' असे नामांकित केले आणि राज्य शासनाच्या वतीने दिनांक ३१/०५/२०१० रोजी नियम तयार केले.

# कार्यपद्धती

- कोणत्याही व्यक्तीस / प्राधिकरणास / संस्थेस राज्य व केंद्र शासन अथवा कोणतेही प्राधिकरण संस्था यांनी बालकांसंदर्भात केलेल्या निम्नलिखित कृती, अपकृतींबाबत स्वयं प्रेरणेने राज्य बाल हक्क आयोगाकडे दाद मागण्यासाठी अर्ज दाखल करता येईल.
- अ) बालकाच्या अधिकाराचा वंचितपणा आणि मानहानी
- ब) बालकांच्या संरक्षण आणि विकासासाठी प्रदान केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी न करणे.
- क) बालकांचे त्रास कमी करण्यासाठी धोरणात्मक निर्णय, मार्गदर्शक तत्वे किंवा निर्बंध यांचे पालन न करणे आणि त्यांचे कल्याण सुनिश्चित न करणे आणि अशा बालकांना दिलासा न देणे.
- ड) बालकाच्या अधिकारात किंवा इतर कोणत्याही गोष्टीच्या वाढीसाठी उपरोक्त कार्यात योगायोगाने आवश्यक वाटत असणारी इतर कार्ये.
- सर्व अर्ज, सचिव, महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण आयोग, तिसरा मजला जी. टी. एस. बिल्डिंग, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०००३० यांना संबोधित केले पाहिजे.
- प्रत्येक अर्जावर नाव, वर्णन, अर्जदार आणि प्रतिवादी यांच्या संपूर्ण पत्रव्यवहाराचा पत्ता निश्चित केला जाईल. हे फुलस्केप (विहीत आकाराचे कागद) कागदावर दुप्पट जागा सोडून टंकलिखित केले जावे आणि योग्य क्रमांकित परिच्छेदानुसार, सर्व वस्तुस्थिती कारणास्तव आणि सुटकेचा दावा केला गेला असेल ते कालक्रमानुसार पुढे मांडले जातील आणि अर्जदार किंवा त्याच्या वकीलाव्दारे स्वाक्षरी केली जाईल.
- अर्जाच्या सहा प्रती दाखल केल्या पाहिजेत आणि त्यासह अर्जाच्या बरोबर असलेल्या त्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत असतील, अर्जाच्या विधिवत साक्षांकित प्रतिज्ञापत्रानुसार ज्याचे समर्थन केले जाईल. अर्जाची सर्व पाने क्रमांकित केली जातील.



- अर्जाची प्रत अर्जदार सर्व प्रतिवादींना पाठवेल आणि टपाल किंवा कुरिअरची पुराव्याची पावतीची छायाचित्र प्रत अर्जासोबत दाखल केली जाईल.
- प्रत्येक अर्जास घटनाक्रम (INDEX) असेल.
- अर्ज मिळाल्यानंतर वकीलामार्फत, केंद्र शासन, राज्य शासन, अन्य कोणताही अधिकार, इलेक्ट्रॉनिक माध्यम किंवा इतर कोणत्याही माध्यमातून पक्षकारांना सुनावणीची नोटीस पाठवण्यात येईल. नोटीसी मध्ये तारीख व आयोगासमोर सुनावणीचे ठिकाण कळविण्यात येईल.
- जेथे समान विषयाकरीता असे पुष्कळ अर्ज प्राप्त झाले आहेत ज्यात सार्वजनिक विषय एकच उपस्थित केला गेला आहे आणि तत्सम विषय मागितले गेले आहेत, आयोग पक्षकारांना वर्तमानपत्रात जाहिरातीव्दारे सार्वजनिक नोटीस बजावू शकतो. अशा प्रकरणांमध्ये अशा नोटीसच्या प्रकाशनाचा खर्च कोण उचलेल हे आयोग निश्चित करू शकेल.
- प्रतिवादीला (अर्जदाराच्या आगाऊ प्रती दिल्याचा पुरावा असलेले) प्रति-प्रतिज्ञापत्र (उत्तर) च्या स्वरूपात अर्जावर लेखी आक्षेप नोंदविण्यास स्वातंत्र्य असेल, प्रतिज्ञापत्रात परिच्छेदानुसार गुणवत्तेवर उत्तर दिले जाईल आणि कोणतीही सामान्य उत्तरे किंवा नकार विचारात धरले जाणार नाहीत. जर प्रतिवादी हे केंद्र शासन, राज्य शासन, शासकीय उपक्रम किंवा केंद्र / राज्य शासनाच्या मालकीचे, व्यवस्थापित किंवा नियंत्रित असलेल्या कोणत्याही प्राधिकरणाचे कार्यालय असेल तर अशा प्रति – प्रतिज्ञापत्रात, प्राधिकरण किंवा उपक्रम विभाग प्रमुखांच्या स्वाक्षरी असतील.
- आयोगाला खालील अधिकार असतील –
- **अ) कोणत्याही व्यक्तीकडून किंवा केंद्र सरकारकडून किंवा राज्यातील किंवा अन्यअधिका-यांकडून कोणत्याही कागदपत्रे मागवणे.**
- **ब) कोणत्याही व्यक्तीला साक्ष देण्याकरिता/पुरावा सादर करण्याकरिता हजर राहण्यासाठी फर्मावणे आणि अशा व्यक्तीकडून एकतर शपथेवर (प्रतिज्ञापत्रावर) किंवा अन्य पुरावे मिळवणे.**
- **क) त्याच्या कार्या संदर्भात आवश्यक असलेल्या व्यक्तीची (अधिकारी)/ अधिकाऱ्यांची उपस्थिती / मदत घेणे.**

- किमान दोन सदस्यांचा समावेश असलेली संस्था अर्ज ऐकण्यास आणि आदेश देण्यास सक्षम असेल.
- आयोग, आवश्यकतेनुसार, क्षेत्रीय भेटी घेईल, आयोगास योग्य वाटेल असे एक किंवा अधिक सदस्यांव्दारे किंवा विशेष आमंत्रित व्यक्तीसोबत किंवा केंद्र शासन, / राज्य शासनाचे अधिकारी, स्वयंसेवी संस्था, संस्था आणि तज्ञ यांच्यामार्फत अधिकारी आणि स्वयंसेवी संस्थासमवेत सार्वजनिक सुनावणी घेईल.
- अशा प्रकरणांमध्ये शक्य होईल असा अंतरिम आदेश आयोग देऊ शकेल; अंतरिम आदेश जारी झाल्यापासून शक्यतो ९० दिवसांच्या आत अंतिम आदेश देईल.
- पक्षकारांना सुनावणीची संधी दिल्यानंतर आयोग लेखी आदेश पाठवेल, त्याच्या प्रती संबंधित पक्षकारांना पाठवल्या जातील.
- समितीव्दारे पारित केलेले सर्व आदेश सचिवाव्दारे प्रमाणित केले जातील आणि त्यावर आयोगाचा शिक्का राहील.

# तक्रारी व तपासणी केलेल्या चौकशी व आयोगा द्वारे घेण्यात आलेल्या सुनावण्या

- महिला व बाल विकास विभाग यांचे कार्यालयीन आदेश दि.३०.१२.२०२१ अन्वये आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांचेकडे अध्यक्ष पदाचा कार्यभार सोपवण्यात आला. मा. श्रीम. रूबल अग्रवाल (भा.प्र.से) यांनी दि.१२.०१.२०२२ रोजी सदर पदाचा कार्यभार स्विकारला. सदर पदाचा कार्यभार त्यांनी दि.०३.०५.२०२२ पर्यंत सांभाळला.

शासन अधिसुचना महिला व बाल विकास दि.२९.०४.२०२२ अन्वये आयोगाचे अध्यक्ष व ६ सदस्य यांची नियुक्ती करण्यात आली होती. सदर नवनिर्वाचित आयोगाने दि.०४.०५.२०२२ रोजी पदाचा कार्यभार स्विकारला आहे. सदर कालावधीपासून डिसेंबर २०२२ अखेर पर्यत आयोगाने प्रलंबित बाल हक्कांचे उल्लंघन याबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य बाल हक्क आय़ोगाने वरळी येथील मुख्यालय, महिला व बाल विकास विभाग मंत्रालय मुंबई, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे, विभागीय उपायुक्त कार्यालय नाशिक, विभागीय उपायुक्त कार्यालय औरंगाबाद या ठिकाणी एकूण २१४ प्रकरणांवर सुनावणी घेतली आहे.

- सदर सुनावणी दरम्यान अर्जदार तसेच प्रतिवादी शाळा, संस्था, संबंधित शासकीय कार्यालय यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिलेली आहे तसेच संबंधितांचे लेखी म्हणणे मांडण्याची देखील संधी दिलेली आहे. सदर प्रकरणांमध्ये नैसर्गिक न्याय तत्वाचा अवलंब केलेला आहे.
- जानेवारी २०२२ ते मार्च २०२२ या कालावधीत प्रशासकीय स्तरावर ११ प्रकरणे दप्तरी दाखल करण्यात आली. तसेच मे २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत एकूण ७८ प्रकरणे निकाली काढण्यात आली असे एकूण ८९ प्रकरणे निकाली काढण्यात आली.
- जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ या कालावधीत एकूण १५८ प्रकरणांवर आयोगाने सुनावण्या घेतल्या. सदर सुनावणी आयोगाचे मुंबई कार्यालय, जिल्हा परिषद अहमदनगर, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी पुणे कार्यालय, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कोल्हापूर कार्यालय येथे संपन्न झाल्या.
- जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ या कालावधीत एकूण ७२ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

# कार्यशाळा / चर्चासत्र / परिसंवाद/ सार्वजनिक सुनावणी




### आंतरराष्ट्रीय बालकामगार विरोधी दिनानिमित्त सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे विविध संस्था, संघटना व प्रशासन यांची परिषद व परिसंवाद (१२ जून २०२२ ते २० जून २०२२)

दि.१२ जुन, २०२२ रोजी बालमजुरी मुक्त महाराष्ट्रासाठी बालमजुरी विरुद्ध जागतिक दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग आणि महिला व बाल विकास विभाग, कामगार आयुक्त,महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर “बालकामगार मुक्त महाराष्ट्र” या कार्यक्रमात आयोगाच्या अँड. सुशीबेन शाह, अध्यक्षा, अँड.निलिमा चव्हाण, सदस्या या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. सदर कार्यक्रमास मा.श्री. सतीश देशमुख, कामगार आयुक्त महाराष्ट्र राज्य, श्रीम. शिरीन लोंखडे, अपर कामगार आयुक्त, कोकण विभाग, श्रीम. निलांबरी भोसले, कामगार उपायुक्त, मुंबई शहर, जिल्हा महिला बाल कामगार अधिकारी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.यावेळी जनजागृतीसाठी रँलीचे आयोजन करण्यात आले होते.






## देशातील बाल लैंगिक अत्याचार या विषयावर चर्चा सत्राचे आयोजन




दि. २९.०७.२०२२ रोजी देशातील बाल लैंगिक अत्याचार SEXUAL VIOLENCE AGAINST CHILDREN IN INDIA (SVAC) या विषयावरील अभ्यास अहवालांचे प्रकाशन सोहळा अँड. सुशीबेन शाह, अध्यक्षा, ॲड. श्रीम.निलिमा चव्हाण, सदस्या, श्री. दीपक पांडे, विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग मुंबई महाराष्ट्र राज्य, यांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमांमध्ये ' बालकांचे लैंगिक शोषणापासून 'निवारण - अनुभव आणि आव्हाने', या विषयावर तज्ञांचे चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. सदर चर्चासत्रामध्ये श्री. दीपक पांडे, विशेष पोलीस महानिरीक्षक तसेच बालकांसाठी कार्यरत असलेल्या मजलीस, जॉइनिंग फोर्सेस फॉर चिल्ड्रन इंडिया, विधायक भारती, युनिसेफ, चाइल्ड लाईन इंडिया अशा खाजगी स्वयंसेवी संस्था व तज्ञांनी सहभाग घेतला. यावेळी पोक्सो प्रकरणातील पीडित बालकांसाठी तातडीने सपोर्ट पर्सन व परिविक्षा अधिकारी उपलब्ध करून देणे अत्यावश्यक असल्याच्या बाबीवर भर दिला व सर्व संबंधित यंत्रणांनी या अनुषंगाने कार्यवाही करणे बाबत अध्यक्षा यांनी सूचित केले.



## बालविवाह मुक्त महाराष्ट्र या विषयावर चर्चा सत्राचे आयोजन

दि. २९.०९.२०२२ रोजी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व कैलाश सत्यार्थी फांऊडेशन यांचे संयुक्त विद्यमाने बाल विवाह मुक्त महाराष्ट्र या विषयावर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाचा उद्देश आगामी २ वर्षात महाराष्ट्र बाल विवाह मुक्त करणे असा होता.




## मुंबई उच्च न्यायालयामार्फत आयोजित POCSO कायद्याच्या अंमलबजावणीवर राज्यस्तरीय चर्चा सत्र

दि.३० सप्टेंबर २०२२ रोजी मुंबई उच्च न्यायालयामार्फत आयोजित POCSO कायद्याच्या अंमलबजावणीवर राज्यस्तरीय चर्चा सत्रात आयोगाच्या अध्यक्षा यांनी सहभाग घेतला. त्यामध्ये विविध प्रशासकीय यंत्रणांनी भाग घेतला.



## युवा चाइल्ड लाईन सामाजिक संस्थेचा प्रतिनिधी सोबत बालकांच्या कल्याणकारी विषया बाबत बैठक आयोजित करण्यात आली

दि. १२ मे २०२२ रोजी, युवा चाइल्ड लाईन या सामाजिक संस्थेचा प्रतिनिधी सोबत बाल हक्क अयोग अध्यक्षा मा. सुशीबेन शहा आणि सचिव श्री. उदय जाधव (भा.प्र.से.) श्री. प्रमोद बाडगी, विधी सल्लागार, श्रीमती माधवी भोसले, प्र. प्रशासकीय अधिकारी, श्रीमती. कल्पना खांबाइत, परिविक्षा अधिकारी सोबत बैठक पार पडली.

प्रामुख्याने बालकाचे शोषणाचे मुद्दे आणि कार्यरत यंत्रणा या बाबत चर्चा करून मुलांना तात्काळ तक्रार दाखल करून घेणे बाबतची कार्यप्रणाली कशी असावी यावर चर्चा झाली. काळजी व संरक्षणाची गरज असेलेल्या मुलांना मदत करणारी आपत्कालीन हेल्पलाईन १०९८ बद्दल जाणून घेतले.

यावेळी युवा संस्थेचे बाल अधिकारी वरिष्ठ कार्यकर्ता श्री. विजय खरात आणि युवा चाईल्ड लाईन, मुंबई शहर केंद्र समन्वय श्री. जितेंद्र चौघुले, यांनी बाल हक्क आयोगाच्या अध्यक्षा आणि सदस्यांना संविधान प्रत देऊन त्यांचे स्वागत केले.



# आयोगाचे महत्त्वपूर्ण कामकाज

**आयोगाने आपली कार्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडताना सक्रिय भूमिका बजावली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**


१.आयोगाने तक्रारींच्या सुनावणीच्या उद्देशाने पुणे, औरंगाबाद, नाशिक, ठाणे, येथील प्रादेशिक मुख्यालयांना भेटी देऊन त्या प्रदेशातील बाल न्याय व्यवस्थेशी संबंधित विविध प्रशासकीय यंत्राणाच्या बैठका घेतल्या आहेत . बाल कल्याण समित्या, बाल न्याय मंडळ, जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण युनिट, कामगार विभाग, पोलीस विभाग, समाजकल्याण विभाग, आदिवासी कल्याण विभाग, शिक्षण विभाग, चाईल्ड लाईन – आणि मुलांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेल्या इतर स्वयंसेवी संस्था या प्रशासकीय यंत्राणा समवेत बालकांबाबतच्या योजना अधिनियम, तक्रारी इत्यादींबाबत चर्चा करण्यात आली.

२.औरंगाबाद विभागातील आयोगाच्या सदस्य यांनी जिल्ह्यातील अल्पवयीन मुलांमध्ये मादक पदार्थांच्या गैरवापराच्या वाढत असलेल्या वापराबाबतची बाब निदर्शनास आणून दिलेली होती. सदर पदार्थास स्थानिक भाषामध्ये "बटण" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या "निओसिन" या औषधाचा मुले आणि तरुणांकडून मोठ्या प्रमाणात नशा करण्यासाठी गैरवापर होत आहे. त्यामुळे आयोगाने २६ ऑगस्ट, २०२२ रोजी औरंगाबाद जिल्हा मुख्यालयाच्या भेटीदरम्यान औरंगाबादचे पोलिस आयुक्त, औरंगाबाद ग्रामीणचे पोलिस अधीक्षक, अन्न व औषध विभागाचे अधिकारी आणि जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळाचे सदस्य व संबंधित इतर स्थानिक अधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती.

- सदर बैठकीत मा.पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांनी नमूद केले की, तरुणांमधील उपरोक्त मादक पदार्थांच्या सेवनाच्या नियंत्रणाकरिता हे औषध केवळ नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाने दिलेल्या प्रिस्क्रिप्शनवर फार्मसीद्वारे विकले जाणे आवश्यक आहे. मात्र, वैद्यकीय प्रिस्क्रिप्शनशिवाय दुकानांमध्ये विकले जात असल्याचे लक्षात येत आहे असे नमूद केले. त्यामुळे अशा प्रथेला आळा घालण्यासाठी आणि या औषधाच्या गैरवापर आणि गैरवापरापासून मुले आणि तरुण पिढीचे पुरेसे संरक्षण करण्यासाठी, या बैठकीत सर्व संबंधितांना आवश्यक ती खबरदारी आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यास सूचित करणे आवश्यक आहे, असे मत मांडले. तसेच याबाबत पोलीस विभागामार्फत अनेक पथकांची स्थापना केलेली असून, धाडसत्र, जनजागृती अभियान, मेडीकल दुकानदार यांचे समवेत बैठक घेऊन व खाजगी स्वयंसेवी संस्था समवेत जनजागृती मोहिम मोठ्या प्रमाणावर केली असल्याचे त्यांनी नमूद केले.
- सदर विषयाबाबत अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत मेडीकल दुकानदारांव्दारे या औषधाच्या विक्री डॉक्टारांचे प्रिस्क्रिप्शनशिवाय केली जात असल्यास कार्यवाही होणे आवश्यक आहे, मात्र, ती केली जात नसल्याचे बैठकी दरम्यान निदर्शनास आले.
- या अनुषंगाने आयोगाने ११ ऑक्टोबर २०२२ रोजीच्या पत्राद्वारे, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई यांना पत्र पाठवले त्यामध्ये अशा प्रकारे नशेसाठी वापर केल्या जाणा-या औषधांच्या अवैध वापर, विक्रीवर निर्बंध आणण्यासाठी सदर औषधांची मागणी करणा-या ग्राहकांकडून डॉक्टरचे मुळ प्रिस्क्रिप्शन पाहून त्याचे झेरॉक्स प्रत किंवा सदर प्रिस्क्रिप्शन स्कॅन करावे तसेच ग्राहकाचे आधारकार्ड झेरॉक्स करून दुकानदारांने दप्तरी ठेवणे आवश्यक आहे. अशी कागदपत्रांची नोंद ठेवणे बाबत सक्ती केल्यास व औषध विक्रेत्यांकडे या ठेवलेल्या अभिलेखांची वारंवार तपासणी केल्यास अशा औषधांच्या अवैध वापर व विक्रीवर निर्बंध येऊ शकतील. तरी या अनुषंगाने उचित कार्यवाही करणेबाबत आयोगाने सुचित केलेल आहे.

३.बाल रक्षक मोहीम

- समाजातील वाईट गोष्टींपासून मुलांचे रक्षण करण्यासाठी, लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि मुलांच्या संरक्षणाच्या उदात्त कार्यात स्वयंसेवक म्हणून सहभागी होण्यासाठी आयोगाने बाल रक्षक” नावाने मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेचा तपशील आयोगाने आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केला आहे. आयोगाने कोल्हापुर दौ-यात बाल रक्षक मोहिमेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी, छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस, एज्युकेशन अँड रिसर्चचे एम.एस.डब्ल्यूचे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, कोल्हापूर जिल्हा बार असोसिएशनचे सदस्य आणि त्यांच्याशी या मोहिमेबाबत संवाद साधला तसेच प्रचार, प्रसार केला.



दूरध्वनी क्र. २२६२०८२६
Email cp.mumbai@mahapolice.gov.in

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग
पोलीस आयुक्त
बृहन्मुंबई यांचे कार्यालय
डॉ.डी.एन.रोड, मुंबई-४००००१

जा.क्र. पोआ/का/1245/2022

दिनांक :०६/०६/२०२२

**कार्यालयीन आदेश**

असे निदर्शनास आले आहे की, जुन्या भांडणाच्या कारणावरून, प्रॉपर्टीच्या वादावरून, पैशाच्या देवाणघेवाणीवरून अथवा वैयक्तिक कारणांवरून पोलीस ठाणेस पोक्सो कायद्यांतर्गत अथवा विनयभंगाची तक्रार करण्यात येते.

सदर गुन्ह्यांत कोणतीही शहनिशा न करता आरोपीस तात्काळ अटक केली जाते. तपास दरम्यान केलेली तक्रार खोटी झाल्याचे निष्पन्न होते व त्यानंतर आरोपीस कलम १६९ सीआरपीसी अंतर्गत रिहा करण्याची कारवाई केली जाते. तोपर्यंत बराच उशीर झालेला असतो. अटकेमुळे आरोपीची नाहक बदनामी होते, समाजातील त्याच्या प्रतिष्ठेस धक्का लागतो व मोठ्या प्रमाणावर आरोपीचे वैयक्तिक नुकसान होते.

अशा गोष्टींना आळा घालण्यासाठी गुन्हा दाखल करतांना सदर प्रकरणात सहाय्यक पोलीस आयुक्त यांची शिफारस आल्यानंतर परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांच्या परवानगी नंतरच गुन्हा दाखल करण्यात यावा अशी सूचना देण्यात येत आहे. परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांनी परवानगीचा निर्णय घेतांना मा. सर्वोच्च न्यायालयाचे ललीता कुमारी प्रकरणातील न्यायनिर्णयाचे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

( संजय पांडे )
पोलीस आयुक्त,
बृहन्मुंबई.

प्रति :

१) पोलीस सह आयुक्त (का. व सु.), मुंबई.
२) सर्व प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त, मुंबई.
३) सर्व परिमंडळीय पोलीस उप आयुक्त, मुंबई.



- ४.पोलीस आयुक्त, मुंबई यांनी दि. ०६.०६.२०२२ रोजी त्यांचे कार्यालयीन आदेशाव्दारे, पोक्सो प्रकरणांमध्ये गुन्हा दाखल करताना सदर प्रकरणात सहाय्यक पोलीस आयुक्त यांची शिफारस आल्यानंतर परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांच्या परवानगी नंतरच गुन्हा दाखल करण्यात यावा अशा सुचना दिलेल्या होत्या.
- या कार्यालयीन आदेशामुळे POCSO प्रकरणांमध्ये एफआयआर नोंदवण्यास विलंब होण्याची शक्यता होती आणि ती कायद्याच्या तरतुदींच्या विरुद्ध असल्याने आयोगाने याबाबत पोलिस आयुक्त आणि गृह मंत्र्यांकडे लेखी निवेदन दिले होते. तसेच मा. पोलीस आयुक्त, मुंबई यांचेसमवेत बैठक घेण्यात आली सदर बैठकीस अँड. सुशीबेन शाह, अध्यक्षा, अँड.संजय सेंगर, सदस्य, श्री. चैतन्य पुरंदरे,सदस्य, अँड. श्रीम.जयश्री पालवे, सदस्या, अँड. श्रीम.निलिमा चव्हाण, श्रीम. सायली पालखेडकर,सदस्या, अँड.श्रीम.प्रज्ञा खोसरे, सदस्या, गृहमंत्री यांचेसमवेत स्वतंत्रपणे बैठक घेऊन चर्चा करण्यात आली होती.
- सबब या अनुषंगाने सदर दि.०६.०६.२०२२ आणि दि.१७.०६.२०२२ रोजीचे कार्यालयीन आदेश दि.१२.०७.२०२२ च्या कार्यालयीन आदेशान्वये रद्द करण्यात आले. व याबाबत पोलीस आयुक्तालया मार्फत प्रेस नोट प्रसिध्द करण्यात आली.

## ५.बाल हक्क सप्ताह या निमित्ताने (दि. २० नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर) "खेलते राहो" या कार्यक्रमाचे आयोजन



दि.२४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर या कालवधीत बाल हक्क सप्ताह सर्वत्र दरवर्षी साजरा केला जातो. या निमित्ताने दि. २० व २१ नोव्हेंबर, २०२२ रोजी "खेलतो रहो" या कार्यक्रमाचे आयोजन प्रियदर्शनी पार्क मलबार हिल येथे करण्यात आले. सदर कार्यक्रम आयोग, युनिसेफ व महिला बाल विकास विभाग यांच्या संयुक्त विदयमाने आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमास IJM, JOINING FORCES FOR CHILDREN IN INDIA, युवा चाईल्ड लाईन, बाल आशा ट्रस्ट, CRY FOUNDATION, समतोल फाऊंडेशन, विधायकभारती, चाईल्ड लाईन, कैलाश सत्यार्थी फाऊंडेशन, प्लान इंडिया इत्यादी खाजगी स्वयंसेवी संस्था यांनीही मदत केली तसेच सहभाग घेतला.

यावेळी विविध NGOS, शाळांमधील अंदाजित ६००० मुलांनी दोन्ही दिवस संपन्न झालेल्या कार्यक्रमात सहभाग घेतला. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी व मनोरंजनासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. चित्रकला, क्रीडा स्पर्धा, संगीत, जादूचे कार्यक्रम, पपेट शो, मातीची भांडी, टॅटू, साहसी क्रिडा प्रकार आणि मनोरंजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात विशेष पोलीस महानिरीक्षक (महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग) यांच्या सहकार्याने "पोलीस दीदी" आणि "पोलीस काका" या संकल्पनेखाली पोस्टर्सचे प्रदर्शन व संवादात्मक भाषणाद्वारे मुलांना मुलांवरील लैंगिक गुन्ह्यांच्या संदर्भात "गुड टच" आणि "बॅड टच" या संकल्पनेविषयी जागरूक करण्यात आले.



सदर कार्यक्रमास अँड सुशीबेन शाह, अध्यक्षा, श्री. उदय जाधव(भा.प्र.से), सचिव, अँड. निलिमा चव्हाण, सदस्या, श्रीम. सायली पालखेडकर, सदस्या, श्री. दिपक पांडे, पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र शासन, श्रीम.आर.विमला, आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, दिव्या सिंग, बास्केटबॉल खेळाडू, श्रीम. अल्पा वोरा, युनिसेफ व अनेक नामांकित खेळाडू तसेच खाजगी स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## ६.**अल्पसंख्यांक विभाग यांचे समवेत बैठक व महत्त्वपूर्ण पत्रव्यवहार**

बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा, २००९ या अधिनियमातील २५ टक्के प्रवेश प्रक्रिया अल्पसंख्याक संस्थांना लागू नाही.  आरटीई प्रवेश प्रक्रियेत काही गरजू आणि पात्र विद्यार्थ्यांना आरटीई प्रवेश देण्यात आल्याचे आयोगाच्या लक्षात आले बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचाअधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदीनुसार, महाराष्ट्रातील बहुसंख्य शाळा अल्पसंख्याक दर्जाचा लाभ घेत आहेत, केवळ वंचित बालकांना शिक्षणाचा अधिकार मिळू नये म्हणून यासाठी सदर संस्था अल्पसंख्यांक प्रमाणपत्र दर्जा प्राप्त करून पळवाटा शोधत असल्याचे निदर्शनास आले आहे.

आयोगाचे दि.१५.११.२०२२ रोजीचे पत्रान्वये अल्पसंख्यांक विभाग मंत्रालय मुंबई यांना पत्र पाठविण्यात आले. त्यामध्ये खालील बाबी नमूद करण्यात आल्या आहेत.

अ)  शासनाच्या अल्पसंख्यांक विभागामार्फत राज्यामध्ये धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते. सदर शाळांमध्ये त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या किमान ५०% जागांवर भाषा अथवा सदर धर्माचे विद्यार्थी असणे अपेक्षित आहे या अनुषंगाने आयोगामध्ये दक्षिण मुंबई विभाग कार्यक्षेत्रातील अल्पसंख्यांक विना अनुदानित शाळांची मागील ३ वर्षांची एकूण विद्यार्थी संख्या व अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची संख्या अशी माहिती शाळांनी स्वतः युडायस पोर्टलवर भरलेली सदर माहिती शिक्षण विभागामार्फत मागविण्यात आली होती.

ब)  सदर माहितीचे अवलोकन केले असता एकूण ६९ शाळांपैकी केवळ २१ शाळांमध्ये अल्पसंख्यांक विद्यार्थी त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी ५०% अथवा जास्त प्रमाणात आढळून आले उर्वरित ४८ शाळांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे प्रमाण अत्यल्प होते, म्हणजेच सदर शाळा अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्रांमधील निकषाचे उल्लंघन करत आहे असे दिसून येते.

क)  सकृतदर्शनी बऱ्याच अल्पसंख्यांक शाळा या बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क-अधिनियम २००९ अंतर्गत २५% प्रवेश प्रक्रिया यापासून स्वत: इतर कायदे व वेगळे नियम लावत असल्याचे दिसून येत आहे, तसेच या शाळा अल्पसंख्यांक प्रमाणपत्र दर्जा प्राप्त करून पळवाटा शोधतात सबब अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्रांची पूर्णतपासणी होणे अतिशय गरजेचे आहे.
या संदर्भात अल्पसंख्यांक विभाग मंत्रालय मुंबई येथे दि.१०.११.२०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती सदर बैठकीस अल्पसंख्यांक विभागाचे सचिव तसेच इतर वरिष्ठ अधिकारी, शिक्षणाधिकारी बृहन्मुंबई, महानगरपालिका तसेच शिक्षण निरीक्षक, दक्षिण विभाग तसेच शिक्षण उपसंचालक मुंबई विभाग कार्यालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते. सदर बैठकीत चर्चेअंति खालील निर्णय घेण्यात आले.



अ) अल्पसंख्याक विकास विभागाकडून महाराष्ट्र राज्यातील ज्या धार्मिक अथवा भाषिक संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे अशा शैक्षणिक संस्था आणि त्या संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळा यांची तपशीलवार माहिती (DATABASE) गोळा करण्यात यावी.

अल्पसंख्याक विकास विभागाकडून ज्या संस्थांना धार्मिक अथवा भाषिक अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे अशा प्रमाणपत्राच्या सत्यतेबाबत आढावा घेऊन बोगस प्रकरणे आढळल्यास अशी प्रमाणपत्रे रद्द करण्यात यावीत.

ब) धार्मिक अथवा भाषिक अल्पसंख्याक संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र देण्यासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाच्या क्रमांक -अशैसं - २०१२/ प्र. क्र. २१/ कार्या. - ५ मंत्रालय, मुंबई - ४०००३२. च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार शैक्षणिक संस्थाना अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र देण्यासंदर्भात विचारविनिमय करून धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा.
या करिता एक कालबध्द कार्यक्रम आखून त्यानुसार (अ ) व (ब) मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

# ७. आयोगाचे संकेत स्थळावरील अद्यावतीकरण

आयोगाने कार्यभार स्विकारल्या नंतर, आयोगाच्या सांकेतिक स्थळावर अनेक बदल करण्यात आले. सदर संकेत स्थळाचा वापर करणा-या सर्व सामान्य वापरकर्त्यास अनुकूल आणि उपयुक्त माहिती उपलब्ध करून देणारे अनुकुल बदल करण्यात आलेले आहेत.

आयोगाच्या पदाधिकाऱ्यांबाबत आवश्यक माहिती, आयोगाचा आदेश, आयोगाची कार्ये, बाल न्याय प्रणालीतील संबंधित प्रशासकीय यंत्रणांबाबत माहिती उदा. बाल कल्याण समित्या, बाल न्याय मंडळ, महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा बाल संरक्षण युनिट, चाइल्ड लाईन या बाबतची माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच, लहान मुलांशी संबंधित विविध कायद्यांशी संबंधित मूळ अधिनियम, तक्रारींचे निवारण करण्यासाठी ई-तक्रार फॉर्म, माहिती अधिकार कायद्यातील तरतुदींनुसार माहिती अधिकारी आणि अपीलीय अधिकारी यांच्या तपशीलांशी संबंधित माहिती, अधिकाराशी संबंधित माहिती, बाल हक्क अधिनियम २००५, बालकांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण कायदा २००९ व बालकांशी संबंधित इतर सर्व अधिनियम इत्यादी माहिती अद्यावत करण्यात आली आहे.

मुलांच्या हितासाठी विविध सरकारी योजनांशी संबंधित तपशीलवार माहिती उदा. माझी कन्या भाग्यश्री योजना, बेटी बचाओ बेटी पढाओ योजना, बाल संगोपन योजना, “ पाळणाघर ” नियम (डे केअर सेंटर/नर्सरी), इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना, किशोरवयीन मुलांच्या सक्षमीकरणासाठी सबला योजना, किशोर शक्ती योजना, एकात्मिक बाल विकास योजना, मनोधैर्य योजना, आयोगाच्या सांकेतिक स्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

संपर्क तपशील उदा. जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी, बाल कल्याण समित्या, बाल न्याय मंडळ, जिल्हा बाल संरक्षण युनिट, निरीक्षण गृह, विशेष गृह, बालगृहे, सुरक्षिततेची ठिकाणे, खुले निवारा गृह या सर्व कार्यालयांचे पत्ते, दूरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी इ., राज्यातील मानवी तस्करी विरोधी युनिट्स इत्यादी देखील आयोगाच्या वेबसाइटवर अपडेट केल्या जातात.

आयोगाने चिराग नावाचे ॲप सुधारित व अद्यावत केले आहे, ज्यामध्ये वरील माहिती FAQ मध्ये देण्यात आली असून, चिराग ॲप हे आयोगाचे संकेत स्थळावरील ई-तक्रारशी संलग्न करण्यात आली आहे, आणि त्याद्वारे ईमेलशी जोडण्यात आली आहे.

# आयोगाचे दौरे व भेटी

**आयोगाची दि.१३.०५.२०२२ रोजी शासकीय मुलींचे विशेष पुनर्वसन केंद्र, देवनार मुंबई येथे भेट**



आयोगाने दि.१३.०५.२०२२ रोजी शासकीय मुलींचे विशेष पुनर्वसन केंद्र, देवनार मुंबई या संस्थेस भेट दिली. यावेळी आयोगाच्या अध्यक्षा, अँड. सुशीबेन शाह, अँड निलिमा चव्हाण, सदस्या, श्री. उदय जाधव (सचिव), श्रीम. शोभा शेलार, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी हे उपस्थित होते. सदर भेटी दरम्यान मुलींच्या सर्व कक्षाची प्रत्यक्ष पाहणी, संस्थेतील मुलींची एकूण संख्या, उपलब्ध सोयी सुविधा यांबाबत आढावा घेण्यात आला. संस्थेमधील गॅस व लाईट सुविधेबाबत कायमस्वरूपी उपाययोजना करणेबाबत आयोग कार्यवाही करेल असे आश्वासन आयोगाने संस्थेला दिले.

# दि.२५.०५.२०२२ रोजी नागपूर जिल्हयातील बाल विवाह प्रतिबंध कार्यवाहीचा आढावा




नागपुर जिल्हयात अनेक अल्पवयीन मुलींचे होणारे बाल विवाह थांबविण्यात आलेले आहे याबाबत माहिती आढावा बैठकीत सबंधित यंत्रणेकडून जाणुन घेतली. बाल विवाह थांबविण्यात आलेल्या मुलींचे पुढे काय होते याबाबत संर्पकात राहुन तिचे योग्य ते पुनर्वसन होणे कामी विविध उपक्रम व योजना आखण्यात याव्यात असे निर्देश देण्यात आले तसेच बाल कामगार बाबत आढावा जाणुन घेण्यात आला जिल्हयात बालविवाह व बाल कामगार होता कामा नये तसेच बाल विवाह झाल्यास व कायदयाचे उल्लंघन झाल्यास बाल कामगार अधिनियम व बालविवाह प्रतिबंध अधिनीयम २००६ अन्वये कायदेशिर रित्या कार्यवाही करण्यात यावी असे आढावा बैठकीत आयोगाच्या अध्यक्षा व सचिव यांनी निर्देश दिले. जिल्हयातील मुली व बालकांच्या सुरक्षेतेकरीता आवश्यक उपाय योजना करण्यात यावी या करीता लागणारा निधी हा जिल्हा नियोजन समितीच्या महिला व बालकाकंकरिता राखीव ३% निधीतून करण्यात यावा, असे निर्देश दिले



## दि.२५.०५.२०२२ रोजी नागपूर येथे महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगा कडून अवैध दत्तक प्रकरणाचे अनुषंगाने आढावा बैठक




दि. २५ मे, २०२२ रोजी ॲड. सुशीबेन शाह, अध्यक्षा यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाचे सचिव, श्री.उदय जाधव (भा.प्र.से.), सदस्य ॲड.श्री.संजय सेंगर यांच्या उपस्थितीमध्ये बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस अतिरिक्त जिल्हाधिकारी, सह पोलीस आयुक्त, जिल्हा पोलिस अधीक्षक, उपसंचालक, आरोग्य विभाग नागपूर तसेच श्री.रवींद्र पाटील, विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग, नागपूर व श्री.सचिन जाधव, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी व श्री.अनिरुद्ध पाटील मुश्ताक पठाण व इतर अधिकारी उपस्थित होते.

सदर आढावा बैठकीत जिल्हयातील अनाथ आश्रमाच्या संचालकाने केलेल्या बेकायदेशीर बाळ विक्री प्रकरणाची माहिती संबंधित महिला व बाल विकास विभागाकडून जाणुन घेवून या सबंधी केलेल्या फौजदारी कार्यवाहीचा अहवाल पोलीस विभागाने बैठकीत सादर केला व जिल्हयात अशाप्रकारे अवैध बाल विक्री होणार नाही याबाबत काय उपाययोजना करता येईल या बाबत आरोग्य विभाग, पोलीस विभाग यांचे कडून सुचना व मते जाणुन घेवून पुन्हा अश्याप्रकारे बाल विक्री होणार नाही यास तात्काळ प्रतिबंध होणेकरीता आरोग्य विभाग, पोलीस विभाग व महिला व बाल विकास विभाग यांनी संयुक्तरित्या जिल्हयामध्ये कार्यवाही करावी. सदर बाल विक्री प्रकरणातील संस्थेच्या संचालकांची सखोल चौकशी व कार्यवाही करण्याचे निर्देश पोलीस यंत्रणेला देण्यात आले.



## येरवडा, पुणे येथील बालगृह व निरीक्षणगृहास मा. सदस्य चैतन्य पुरंदरे व ॲड जयश्री पालवे यांची भेट :-



दिनांक ०३-०६-२०२२ रोजी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा मा. ॲड. श्रीमती. सुशीबेन शहा आणि मा. सचिव, श्री. उदय जाधव (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली आयोगाचे मा. सदस्य ॲड. निलिमा चव्हाण, ॲड. जयश्री पालवे व श्री. चैतन्य पुरंदरे यांनी आयोगात उपस्थित राहून दि. २६ व २७ रोजी पुणे येथे संपन्न झालेल्या सुनावण्यांबाबतच्या इतिवृत्तांचा आढावा घेतला. सर्व प्रकरणांची सविस्तर माहिती घेतली व पुढील दुसऱ्या ४९ प्रकरणांबाबतच्या नस्तीचे वाचन केले.



# दि.०५.०८.२०२२ रोजी शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा विनवळ तालुका जव्हार, जिल्हा पालघर येथे भेट



जव्हार तालुका, जिल्हा पालघर येथे आयोगाचे ॲड.श्रीम. सुशीबेन शाह, अध्यक्षा, ॲड.श्रीम. निलिमा चव्हाण, सदस्या, श्रीम. सायली पालखेडकर, सदस्या, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांनी शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा विनवळ तालुका जव्हार, जिल्हा पालघर येथे भेट दिली. तसेच तीन आश्रम शाळेसाठी एकत्रित असलेल्या विनवळ येथील सेंट्रल किचनला भेट दिली. सदर प्रसंगी श्रीम. आयुषी सिंह (भा.प्र.से.) प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार, जिल्हा पालघर, श्री. गोविंद बोडके (भा.प्र.से), जिल्हाधिकारी पालघर, श्री. विजय मोरे, सहाय्य प्रकल्प अधिकारी (प्रशासन), श्री. सुभाष परदेशी, सहाय्य प्रकल्प अधिकारी (शिक्षण), श्री. मल्लीनाथ कांबळे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी पालघर हे उपस्थित होते.



## दि.२६.०८.२०२२ रोजी औरंगाबाद पोलीस आयुक्त येथे महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची आढावा बैठक:-



औरंगाबाद पोलीस आयुक्त डॉ. निखिल गुप्ता (IPS) व औरंगाबाद, जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. मनीष कलवानिया (IPS) यांच्यासमवेत दि. २६.०८.२०२२ रोजी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची आढावा बैठक पार पडली. यावेळी औरंगाबाद शहर व ग्रामीण मधील बालकांशी निगडीत कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा करण्यात आली. यावेळी मुख्यत्वे औरंगाबाद शहर व ग्रामीण मध्ये सर्रास सुरु असलेली बटन गोळीतून होणारी ड्रग्ज विक्री, पोक्सोशी संबंधित केसेस, बालस्नेही पोलीस कक्ष, SJPU, प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये बालकांशी संबंधित यंत्रणेचे माहिती फलक लावणे, चाइल्ड फ्रेंडली एफआयआर इत्यादी विषयांवर चर्चा करून याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.



# दि. ३०.०८.२०२२ रोजी बीड येथील अवैध गर्भपात प्रकरणी आयोगाची गृह भेट



महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने बकरवाडी, जिल्हा बीड येथे पीडित कुटुंबियांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन वस्तुस्थिती जाणून घेतली. आयोगाच्या अध्यक्षा मा. अँड.सुशीबेन शाह व चैतन्य पुरंदरे, सदस्य अँड. प्रज्ञा खोसरे, सदस्या यांनी बकरवाडी येथे जाऊन गर्भपात प्रकरणात आपली माता गमावलेल्या तीनही मुलींची भेट घेऊन त्यांची विचारपूस केली. यावेळी आयोगाच्या अध्यक्षा अँड. सुशीबेन शाह यांनी सदर मुलींना मानसिक आधार देऊन जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. नंदकुमार ठाकूर यांच्याशी चर्चा करून सदर प्रकरणातील कायदेशीर बाबी जाणून घेतल्या. तसेच मुलींचे पुनर्वसन, त्यांचे शिक्षण इत्यादींची जबाबदारी बाल हक्क आयोग घेऊन याबाबतीत योग्य ती कार्यवाही करेल असे आश्वासन दिले. मुलींची वैद्यकीय स्थिती देखील जाणून घेतली व याबाबत योग्य त्या उपाययोजना त्वरित करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला दिले. यावेळी जिल्हा बाल कल्याण समिती, जिल्हा बाल न्याय मंडळ सदस्य, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी उपस्थित होते.

तसेच बाल हक्क आयोगाने पाली येथील एड्स बाधित दाम्पत्याच्या मुलास तेथील शाळेत बसू न दिल्याच्या प्रकरणी पाली येथेही भेट देऊन ग्रामस्थ, सरपंच, शिक्षणाधिकारी, शाळाचालक व इतर पालकांशी चर्चा केली. तसेच याप्रकरणातील मुलाची भेट घेऊन विचारपूस केली. यावेळी आयोगाच्या अध्यक्षांनी एड्सच्या बाबतीत समाजात असणारे गैरसमज दूर होऊन अश्या केसेसमध्ये बालकांवर अन्याय होणार नाही याबाबतीत दक्षता घेण्याची सूचना केली. तसेच आगामी गणेशोत्सव, नवरात्री उत्सवात याबाबतीत प्रबोधन करणारे जनजागृतीपर उपक्रम प्रशासन व ग्रामस्थांनी राबवून याबाबतीतील समाजातील गैरसमज दूर करण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले.

## दि.१२.०९.२०२२ रोजी राष्ट्रीय पोषण आहार महिना, बालविकास प्रकल्प धारावी, मुंबई शहर अंतर्गत अंगणवाडी भेट तसेच लाभार्थी समवेत संवाद.



धारावी प्रकल्पांतर्गत अंगणवाडी क्रमांक २५ येथे दि. १२.०९.२०२२ रोजी पोषण अभियान अंतर्गत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. अंगणवाडीतील बालक व त्यांचे पालक यांच्याशी आयोगाच्या अध्यक्षा, ॲड. सुशीबेन शाह, अँड, निलिमा चव्हाण, सदस्या, श्री. उदय जाधव, (भा.प्र.से), सचिव, यांनी संवाद साधला.

पोषण आहाराचे प्रदर्शन, हाटबाजार प्रदर्शन, अंगणवाडी सेविका तसेच मदतनीस यांनी तयार केलेल्या विविध वस्तू तसेच पोषक आहाराचे प्रात्याक्षिक व माहिती देण्याचे नियोजन कार्यक्रमाच्या ठिकाणी करण्यात आले होते. गरोदर स्तनदा महिला व बालकाच्या दैनंदिन जीवनामध्ये पोषणाचे महत्त्व यावर अध्यक्षांनी मार्गदर्शन दिले.

# दि.१३.०९.२०२२ रोजी इ. १० वी व १२ वी च्या परिक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या मुलांचा गुणगौरव समारंभ




बाल आशा ट्रस्ट व महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांचे संयुक्त विदयमाने मुंबई शहर व उपनगर परिसरातील बालगृह, निरीक्षणगृह अशा महिला व बाल विकास विभागाच्या संस्थामध्ये राहून इ. १० वी व १२ वी च्या परिक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या मुलांचा गुणगौरव समारंभ बॉम्बे स्टॉक एक्सचेंजमध्ये आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमास आयोगाच्या अँड.सुशीबेन शाह, अध्यक्षा, अँड. निलिमा चव्हाण, सदस्या, श्री. उदय जाधव, सचिव(भा.प्र.से), हे उपस्थित होते. तसेच श्री. सुनिल अरोरा, बाल आशा ट्रस्ट, श्रीम. शोभा शेलार, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, मुंबई शहर व अनेक गुणवंत विद्यार्थी उपस्थित होते.

# दि. १८/१०/२०२२ रोजी नाशिक येथील महाराष्ट्र पोलीस अकॅडमीमध्ये बालकांशी संबंधित कायद्याविषयी दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर



नाशिक येथील महाराष्ट्र पोलीस अकॅडमीमध्ये प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षकांचे प्रशिक्षण शिबिर दि.१८.१०.२०२२ रोजी आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी आयोगाच्या अध्यक्षा यांनी, “बालस्नेही महाराष्ट्रासाठी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग विविध शासकीय यंत्रणेसोबत संवाद साधून जागरूकता निर्माण करत आहे. या प्रक्रियेमध्ये पोलीस हा अत्यंत महत्वाचा घटक असून पोलिसांनी आत्मीयतेने व संवेदनशीलपणे कायद्याच्या चौकटीत राहून बालकांच्या बाबतीतील प्रकरणे हाताळावीत" असे प्रशिक्षण शिबिराच्या उदघाटन प्रसंगी नमूद केले. यावेळी महाराष्ट्र पोलीस अकॅडमीचे संचालक श्री.राजेश कुमार (IPS), जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.सचिन पाटील (IPS), पोलीस आयुक्त श्री.गौरव सिंग (IPS) तसेच महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्य अँड. संजय सेंगर, अँड. निलिमा चव्हाण, अँड. जयश्री पालवे, श्रीम.सायली पालखेडकर, श्री. चैतन्य पुरंदरे इत्यादी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व आयजेएम या संस्थेतर्फे महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे बालकांशी संबंधित कायद्याविषयी दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते.

## दि. १४/११/२०२२ रोजी भायखळा कारागृहातील महिला कैदीच्या लहान बालकांसाठी बँक ऑफ इंडिया मार्फत बालकांसाठी खेळाचे साहित्य, शैक्षणिक साहित्य आणि छोट्या खुर्च्यांचे बालदिना निमित्ताने वाटप



महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग आणि जिल्हा महिला व बाल विकास आधिकारी कार्यालय यांनी भायखळा कारागृहांच्या मा. श्री. गजानन सरोदे, जेलर भवर यांच्या सहकायनि कारागृहांतील महिला कैदीच्या लहान बालकांसाठी बँक ऑफ इंडिया मार्फत बालकांसाठी खेळाचे साहित्य, शैक्षणिक साहित्य आणि छोट्या खुर्च्यांचे  बालदिन निमित्ताने वाटप करण्यात आले. तसेच CCDT या संस्थेमार्फत बालकांना पॅक स्नॅक्सचे वाटप या निमित्ताने करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या वेळी महिलांशी आणि उपस्थित बालकांसोबत संवाद साधला. तसेच आपल्या समाजातून बाल शोषण पूर्णपणे नष्ट होण्याच्या दृष्टीने सतत प्रयत्नशील असतात. याशिवाय कोणतेही बालक आर्थिक कारणांमुळे शिक्षणापासून वंचित राहू नये आणि बाल कल्याणाच्या सर्व योजनांचा लाभ सर्व बालकांपर्यंत पोहचवता यावा या उद्देशाने या कार्यक्रमाच्यावेळी कारागृह अधिक्षक यांचे समवेत चर्चा करण्यात आली. त्या प्रसंगी आयोगाचे अध्यक्षा व सचिव तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीमती शोभा शेलार या उपस्थित होत्या.

सदर कार्यक्रमाच्या नियोजनात प्रयास संस्था आणि संबंधित अंगणवाडी सेविका, मदतनिस यांनी सहकार्य केले. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयांतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या वेळी उपस्थित राहून कार्यक्रम सफल करण्यात हातभार लावला.

# दि. २४.१२.२०२२ महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बालकांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन





महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व बृहन्मुंबई महानगरपालिका आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बालकांसाठी आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले. अनेक साथीच्या आजारामुळे जनसामान्यांमध्ये आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. विशेषतः महिला व बालक यांमध्ये आजाराचे प्रमाण जास्त आढळून येत होते. गोवर या आजारामुळे अनेक बालकांचा मुंबई व राज्यात मृत्यू झालेला असून या आजारामुळे अनेक बालके मुंबई शहरात ग्रासलेली होती.

या कारणास्तव महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडून डी-वार्ड विभागातील बृहन्मुंबई महानगरपालिकाच्या आरोग्य विभागासमवेत महिला व बालकांसाठी आरोग्य तपासणी शिबिर लसीकरण आयोजित करण्यात आले होते.

सदर शिबिरास सुमारे ५०० महिला व बालकांनी शिबिराचा लाभ घेतला. सदर शिबिरासाठी बालक व महिलांना मोफत लसीकरण, वैद्यकीय तपासणी, मलेरिया, टी.बी. यांची तपासणी, दातांची तपासणी करण्यात आली.

# दि. २६-१२-२०२२ रोजी, आयोगाच्या अध्यक्षा, ॲड. सुशीबेन शाह, व अधिकारी यांची अदित्या बिर्ला बालगृह, चेंबूर, मुंबई येथे भेट :-



आयोगाच्या अध्यक्षा, ॲड. सुशीबेन शाह, सचिव श्री. उदय जाधव (भा.प्र.से.) श्री. बी एच. नागरगोजे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर यांनी अदित्या बिर्ला बालगृह, चेंबूर, मुंबई येथे भेट दिली. सदर बालगृहातील ५ बालके आजतागायात संस्थेमधून पळून गेले आहेत या पार्श्वभूमीवर आयोगाने बालगृहाला भेट दिली.

बालगृहातील मुलांच्या सर्व कक्षांची प्रत्यक्ष पाहणी केली, संस्थेतील मुलांची एकूण संख्या, त्यांचे साठी उपलब्ध सोयी सुविधा या बाबत विस्तृत माहिती घेतली. सर्व मुलांसमवेत आपुलकी व जिव्हाळ्याने संवाद साधला. त्यामुळें सर्व मुलींनी त्यांच्या सोबत स्वतःचे भावी आयुष्यातील त्यांचे ध्येय व स्वप्नाबाबत मनमोकळ्या गप्पा मारल्या. बालकांच्या मनातले प्रश्न जाणून घ्यायचा प्रयत्न केला. आयोगाच्या अध्यक्षा, सचिव, व इतर अधिकाऱ्यांनी संस्थेमध्ये दैनंदिन अडचणी बाबत विस्तृत माहिती घेतली. सदर भेटीचे प्रसंगी संस्थेतील अधिकारी-कर्मचारी तसेच पोलीस विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

संस्थेमध्ये असे प्रकार वारंवार घडू नयेत याबाबत अभ्यास व निरीक्षण करून सर्व यंत्रणांनी जागृत व सतर्क रहावे, व याची दक्षता घ्यावी, अशा सूचना सर्व संबंधितांना दिल्या...


## आयोगामार्फत जानेवारी २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत विविध प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात आले.

| अ. क्र. | दिनांक | ठिकाण | आयोजनात सहभागी यंत्रणा | विषय | वक्ते | प्रशिक्षणात सहभागी प्रशासकीय यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०.०६.२०२२ | प्रबोधिनी, अमरावती | महिला व बाल विकास विभाग | बाल न्याय मुलांची (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ चे कलम ७४-८९ | ॲड. संजय सेंगर, सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग | महाराष्टातील सन २०२२ मध्ये नवनियुक्त सर्व बाल कल्याण समितीचे अध्यक्ष व सदस्य यांचे प्रशिक्षण |
| २ | २७.०६.२०२२ | प्रबोधिनी, अमरावती | महिला व बाल विकास विभाग | बाल न्याय मुलांची(काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ चे कलम ७४-८९ | ॲड. संजय सेंगर, सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग | महाराष्टातील सन २०२२ मध्ये नवनियुक्त सर्व बाल कल्याण समितीचे अध्यक्ष व सदस्य यांचे प्रशिक्षण |
| ३ | १६.०७.२०२२ | पोलीस कॉलनी हॉल, निमवाडी, अकोला | जिल्हा विधा सेवा प्राधिकरण अकोला आणि पोलीस विभाग अकोला | बाल न्याय मुलांची(काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ तसेच पोक्सो ॲक्ट २०१२ या अधिनियमांच्या अंमलबजावणीमध्ये पोलीसांची भुमिका | | अकोला जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी |

| अ. क्र. | दिनांक | ठिकाण | आयोजनात सहभागी यंत्रणा | विषय | वक्ते | प्रशिक्षणात सहभागी प्रशासकीय यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | १३.१०.२० २२ | महाराष्ट्र पोलीस अँकेडमी, नाशिक | IGM संस्था | बाल न्याय मुलांची(काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ तसेच पोक्सो अँक्ट २०१२ या अधिनियमांच्या अंमलबजावणीमध्ये पोलीसांची भुमिका | अँड. श्रीम. रेनिता मेनेझ आणइ अँड. श्री. काईल डीसुझा | नाशिक शहर व ग्रामीण मधील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी |
| ५ | २९ ऑक्टोबर , २०२३ | अकोला | पोलीस ट्रेनिंग सेंटर, अकोला | बाल न्याय मुलांची (काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ तसेच पोक्सो अँक्ट २०१२ | अँड. श्री. संजय सेंगर | प्रशिक्षणार्थी पोलीस |
| ६ | ०८.११.२ ०२२ | SDPO ऑफीस, अंबाजोगाई | मनस्विनी महिला प्रकल्प संस्था, अंबाजोगाई | बालविवाह कायदा २००६ | अँड. संजय सेंगर, सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग | पोलीस तसेच अंगणवाडी कर्मचारी |

| अ. क्र. | दिनांक | ठिकाण | आयोजनात सहभागी यंत्रणा | विषय | वक्ते | प्रशिक्षणात सहभागी प्रशासकीय यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | २०.१२.२०२२ | आयुक्त, नाशिक पोलीस यांचे कार्यालय | चाईल्ड लाईन, नाशिक | बाल न्याय मुलांची(काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ तसेच पोक्सो अॅक्ट २०१२ या अधिनियमांच्या अंमलबजावणीमध्ये पोलीसांची भुमिका | अॅड. संजय सेंगर, सदस्य, श्रीम. सायली पालखेडकर, सदस्या, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग | पोलीस अधिकारी व कर्मचारी |
| ८ | २१.१२.२०२२ | अरोरा टॉवर कॅम्प, पुणे | महिला व बाल विकास विभाग | बाल विवाह प्रतिबंध कायदा २००६, आणि बाल कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ तसेच अनैतिक वाहतूक प्रतिबंध कायदा १९५६ | अॅड. संजय सेंगर, सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग | महाराष्ट्रातील सन २०२२ मध्ये नवनियुक्त सर्व बाल कल्याण समितीचे अध्यक्ष व सदस्य यांचे प्रशिक्षण |
| ९ | २६.१२.२०२२ | अरोरा टॉवर कॅम्प, पुणे | महिला व बाल विकास विभाग | बाल विवाह प्रतिबंध कायदा २००६, आणि बाल कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ | अॅड. संजय सेंगर, सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग | महाराष्टातील सन २०२२ मध्ये नवनियुक्त सर्व बाल कल्याण समितीचे अध्यक्ष व सदस्य यांचे प्रशिक्षण |

# माहे जानेवारी 2022 ते डिसेंबर 2022 या वर्षाच्या गोषवारा




## एकूण-272



# जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ या वर्षाचा गोषवारा

| अनु. क्र | विषय | आलेले अर्ज |
|---|---|---|
| १ | शिक्षण | ९९ |
| २ | सुमोटो | १३४ |
| ३ | पॉक्सो | ०६ |
| ४ | बालविवाह | ११ |
| ५ | कस्टडी | ०३ |
| ६ | कौटुंबिक हिंसाचार | ०२ |
| ७ | इतर | ०६ |
| ८ | एकूण | २७ |



## ९) ऑडिरचा अहवाल व ताळेबंद अहवाल सन २०२२-२३ :--

लेखा परीक्षण अहवाल कार्यवाहित असून, वेगवेगळ्याने सादर करण्यात येईल.

Eb 1413 M (8)


स्वप्न बलशाली राष्ट्राचे बालमतांच्या सन्मानाचे
स्वप्न बालस्नेही महाराष्ट्राचे बालमतांच्या सन्मानाचे
बाल हक्क संरक्षण आयोग
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग
३ रा मजला, शासकीय परिवहन सेवा इमारत, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई - ४०००३०
ई-मेल :- mscpcr@gmail.com • दूरध्वनी क्र. ०२२- २४९२०८९४